# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १३/२/२०२४ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४४** **विषय क्रमांक- ५४४**
**दिनांक – १३/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५४४ दिनांक - १३/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कर/मुख्य/०९/कावि/१६/२०२४ दि.०२/०१/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३००६ दि.०६/२/२०२४ अन्वये, सन 2024-2025 या सरकारी वर्षाकरिता करांचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीकामी मान्यता घेणेबाबत. |
| **ठराव क्र. ५४४ दिनांक - १३/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कर/मुख्य/०९/कावि/१६/२०२४ दि.०२/०१/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३००६ दि.०६/२/२०२४ अन्वये, मनपाचे कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 127 व 129 मधील तरतूदीनुसार शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कर आकारणीची तरतूद आहे. आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मालमत्तांवर कलम 99 मधील तरतूदीनुसार मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या दराने मालमत्ता कराची आकारणी करणेत येते. तसेच शासनाचे शिक्षणकर, रोजगार हमी कर व फ्लोअरेज कराची वसुली राज्य शासनाने ठरवून दिलेल्या दराने महाराष्ट्र शासनाचे करिता केली जाते. सन 2024-2025 या सरकारी वर्षाकरिता दिनांक 20 फेब्रुवारी 2024 पूर्वी करांचे दर ठरविणे आवश्यक आहे. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 99 मधील तरतूदीनुसार सन 2024-25 या वित्तिय वर्षासाठी खालील प्रमाणे कर व करेत्तर बाबींचे दर मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव : सन 2024-2025 या सरकारी वर्षाकरिता करांचे व करेत्तर बाबींचे दर निश्चितीबाबत. |

**अ. करांचे दर**

| अ क्र | कराचे नाव | करआकारणी पध्दत करयोग्यमूल्यावर | सन 2023-2024 चे प्रचलित दर (सध्याचे) | | सन 2024-2025 करिता प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | निवासी | निवासेत्तर | निवासी | निवासेत्तर |
| 1 | सामान्य कर | रक्कम रुपये 1/- ते 12000/- | 13% | 14% | 13 % | 14% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम रुपये 12001/- ते 30000/- | 16% | 17% | 16 % | 17% |
| | | रक्कम रुपये 30001/- व त्यापुढील | 24% | 24% | 24 % | 24% |
| 1 ब | साफसफाई कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 6% | 5% | 6% |
| | अग्निशामक कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 2% | 2% | 2% |
| | मनपा शिक्षणकर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 2 | मलप्रवाह सुविधा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 5% | 5% | 5% | 5% |
| 3 | पाणीपुरवठा लाभ कर | करयोग्यमूल्यावर | 4% | 5% | 4% | 5% |
| 4 | रस्ता कर | करयोग्यमूल्यावर | 2% | 3% | 2% | 3% |
| 5 | विशेषसाफसफाईकर (फक्तमॉल्स, लॉजिंगबोर्डिंग, मंगलकार्यालय,सभागृह , रुग्णालय, हॉटेल्स, कॅन्टीन्स, रेस्टॉरंटयास्वरुपाच्या मिळकतींस) | करयोग्यमूल्यावर | -- | 2% | -- | 2% |
| 6 | वृक्षकर | करयोग्यमूल्यावर | 1% | 1% | 1% | 1% |
| 7 | नाटयगृहा वरील कर (करमणूक कर) | 1. सिनेमा | | | | |
| | | अ) 500 पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.250/- | | प्रती दिवस रु.250/- | |
| | | ब) मराठी सिनेमा | करमाफी | | करमाफी | |
| | | क) वातानुकुलित थिएटर प्रती स्क्रीन | प्रती दिवस रु.350/- | | प्रती दिवस रु.350/- | |
| | | 2. नाटक, सर्कस (कॉर्निव्हलटेंटस्), तमाशा, संगीतजलसे/शास्त्रीयसंगीत जलसे(थियटरमधील किंवाथियटरव्यतिरिक्तप्रत्येकप्रयोगास) | प्रती प्रयोगास रु.100/- | | प्रती प्रयोगास रु.100/- | |
| | | 3. कुस्त्या / मुष्टीयुध्द | प्रती प्रयोगास रु.50/- | | प्रती प्रयोगास रु.50/- | |
| | | 4. वरील खेरीज इतर प्रत्येक प्रयोगास (जर वेगवेगळे खेळ नसतील तर अशा प्रत्येक दिवसास | प्रती दिवस रु.100/- | | प्रती दिवस रु.100/- | |

**ब.सामान्यकरातील सवलत योजना तपशील**

| अ क्र | लाभधारक | सवलत योजना स्वरूप | सन 2023-2024 करिता (चालू मागणीत सवलत) | सन 2024-2025 करिता (चालू मागणीत सवलत) | भरणा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आगाऊ मालमत्ताकर भरणारे | थकबाकीसह दोन्ही सहामाहीची संपूर्ण रक्कम एक रकमी आगाऊ भरणा-यां करिता | देय सामान्य कर रक्कमेच्या निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळ्या जमिनी इ. मालमत्ता - 5% | देय सामान्य कर रक्कमेच्या निवासी / बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळ्या जमिनी इ. मालमत्ता - 5% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| 2 | महिला | फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका निवासी मालमत्तेस | देय सामान्य कर रक्कमेच्या 30% | देय सामान्य कर रक्कमेच्या 30% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| 3 | दिव्यांग | 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असणा-या दिव्यांग व्यक्तींचे (अंध, दिव्यांग, मतिमंद, कर्णबधिर व मूकबधिर इ.) फक्त एका मालमत्तेस | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | निरंतर |
| 4 | स्वातंत्र्य सैनिककिंवा त्यांचेपत्नी | स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचेपत्नी यांचे फक्त एका निवासी मालमत्तेस | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | देय सामान्य कर रक्कमेच्या 50% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| 5 | ग्रीहा : ग्रीन बिल्डींग | ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मालमत्ता ग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिम मधील 2500 चौ.मी. पेक्षा जास्त भूखंडावरील प्रकल्प | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>3 Star Rating - 05%<br>4 Star Rating - 08%<br>5 Star Rating- 10% | देय सामान्य कररक्कमेच्या<br>3 Star Rating - 05%<br>4 Star Rating - 08%<br>5 Star Rating- 10% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डींग | स्वग्रीहा : ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टिममधील | देय सामान्य कर रक्कमेच्या | देय सामान्य कर रक्कमेच्या | माहे एप्रिल ते जून |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2500 चौ.मी. पेक्षा कमी भूखंडावरील प्रकल्प | 1 Star Rating - 05%<br>2 Star Rating - 08%<br>3 Star Rating- 10%<br>4 Star Rating- 12%<br>5 Star Rating- 15% | 1 Star Rating - 05%<br>2 Star Rating - 08%<br>3 Star Rating- 10%<br>4 Star Rating- 12%<br>5 Star Rating- 15% | अखेर |
| | 6 | ऑनलाईन पेमेंट RTGS, NEFT व IMPS मार्फत भरणा | ऑनलाईन पेमेंट गेट-वे, RTGS, NEFT व IMPS द्वारे भरणा करणारे मालमत्ताधारक | देय सामान्य कर रक्कमेच्या 5% | देय सामान्य कर रक्कमेच्या 5% | माहे एप्रिल ते जून अखेर |
| | | | | देय सामान्य कर रक्कमेच्या 4% | देय सामान्य कर रक्कमेच्या 4% | माहे जुलै ते सप्टेंबर अखेर |
| | 7 | कंपोस्टींग / एस.टी.पी. / झीरो वेस्ट यत्रंणा कार्यान्वित असलेल्या निवासी मालमत्ता | कंपोस्टींग यंत्रणा, एस.टी.पी. प्लांट, तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणाऱ्या इमारतींमधील निवासी मालमत्ता | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असल्यास (ओला कचरा पूर्णत: जिरविणा-या) -5%<br>2. एसटीपी कार्यान्वीत असलेस - 3%<br>3. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा + एसटीपी कार्यान्वीत असलेस - 8%<br>4. झिरो वेस्ट संकल्पना राबविणेत येत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या)-8%<br>5. झिरो वेस्ट + एस.टी.पी. कार्यान्वीत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या) - 10% | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असल्यास (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या)-5%<br>2. एसटीपी कार्यान्वीत असलेस - 3%<br>3. ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा + एसटीपी कार्यान्वीत असलेस - 8%<br>4. झिरो वेस्ट संकल्पना राबविणेत येत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या)-8%<br>5. झिरो वेस्ट + एस.टी.पी. कार्यान्वीत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या) - 10% | निरंतर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | शैक्षणिक इमारती | शैक्षणिक संस्थांच्या मालमत्तेमध्ये कम्पोस्टिंग यंत्रणा,झिरो वेस्ट संकल्पना,रेनवॉटर हार्वेस्टिंग व सौरउर्जा प्रकल्प असणा-या मालमत्ता | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. ऑनसाईट कम्पोस्टिंग-4%<br>2. झिरो वेस्ट – 7%<br>3. झिरो वेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग - 8%<br>4. झिरो वेस्ट+सौरउर्जा–9%<br>5. झिरोवेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग + सौरउर्जा–10% | देय सामान्य कर रक्कमेच्या<br>1. ऑनसाईट कम्पोस्टिंग-4%<br>2. झिरो वेस्ट – 7%<br>3. झिरो वेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग - 8%<br>4. झिरो वेस्ट+सौरउर्जा–9%<br>5. झिरोवेस्ट+रेनवॉटर हार्वेस्टिंग + सौरउर्जा–10% | निरंतर |
| | 9 | महाराष्ट्र इलेक्टीक वाहन धोरण-2021 | स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात 2% सूट | मालमत्ता करात 2% सूट | निरंतर |
| | 10 | शौर्य पदकधारक, | संरक्षण दलातील शौर्य पदक धारक | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| | 11 | अविवाहीत शहीद सैनिक , | अविवाहीत शहीद सैनिक (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| | 12 | माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी | माजी सैनिक व सैनिक विधवा /पत्नी (शासन निर्णयानुसार) | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | मालमत्ता करात (सामान्यकर, मलप्रवाह सुविधा लाभकर, पाणीपुरवठा लाभ कर, रस्ता कर) 100% सूट | निरंतर |
| | 13 | चालू आर्थिक वर्षात नवीन आकारणी | चालू आर्थिक व र्षातआकारणी पुस्तकात नवीन | देय सामान्य कर रक्कमेच्या निवासी / बिगरनिवासी / मिश्र / | देय सामान्य कर रक्कमेच्या निवासी / बिगरनिवासी / मिश्र / | परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/9/ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | होणा-या मालमत्ता | नोंद होणा-या मालमत्तांसाठी सवलत योजना | औद्योगिक / मोकळया जमिनी इ. मालमत्ता - 5% | औद्योगिक / मोकळया जमिनी इ. मालमत्ता - 5% | कावि/327/2022, दिनांक 20/10/22 |
| 14 | सलग तीन वर्षे मालमत्ताकर भरणारे मालमत्ताधारक | प्रामाणिकपणे मागील 3(तीन) सलग वर्षे मिळकत कराचा भरणा करणारे मालमत्ताधारक | देय सामान्य कर रक्कमेच्या 2% जादा प्रोत्साहन पर सवलत | देय सामान्य कर रक्कमेच्या 2% जादा प्रोत्साहन पर सवलत | निरंतर |
| 15 | स्वयंस्फुर्तीने मालमत्ता नोंद Ease Online Self-Assessment | **“माझी मिळकत, माझी आकारणी” - स्वयं स्फुर्तीने महापालिकेच्या संकते स्थळावरुन मालमत्ता कर आकारणीसाठी ऑनलाईन पध्दतीने नोंदणीकरणारे मालमत्ताधारक** | देय सामान्य कर रक्कमेच्या - 5% | देय सामान्य कर रक्कमेच्या - 5% | निरंतर |

वरीलप्रमाणे सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता कर व करेत्तर बाबींचे दरास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४५** **विषय क्रमांक- ५४५**
**दिनांक – १३/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५४५ दिनांक - १३/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. कर/मुख्य/०९/कावि/१८/२०२४ दि.०५/०२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३००७ दि.०६/२/२०२४ अन्वये, मालमत्ता सर्वेक्षणात नवीन आकारणी होणा-या मालमत्तांचे प्रथम बिल दिलेनंतर संपूर्ण मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरणा करणा-या मालमत्ताधारकांना सामान्य करात सवलत देणेबाबत. |
| **ठराव क्र. ५४५ दिनांक - १३/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. कर/मुख्य/०९/कावि/१८/२०२४ दि.०५/०२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३००७ दि.०६/२/२०२४ अन्वये, मनपाचे करआकारणी व करसंकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 127,128 व 129 मधील तरतुदीनुसार मालमत्ताकराची आकारणी व वसुली करणेत येते. मालमत्ताकर आकारणी रजिष्टरला नोंद असलेल्या मालमत्तांना प्रतिवर्षी अनुसूची “ड” प्रकरण 8 नियम 39 |

नुसार मालमत्ताकराचे बिल देण्यात येते. तसेच नियम 30 अन्वये मालमत्ता कर 01 एप्रिल व 01 ऑक्टोबर रोजी सुरु होणा-या सहामाही हस्याने आगाऊ देय आहे. मालमत्ता कराची बिले आर्थिक वर्षे सुरु झाल्यानंतर दिनांक 01 एप्रिल रोजी जनरेट करून ऑनलाईन उपलब्ध करून देणेत येतात. मालमत्ताकराचा भरणा नियमित होणे, करवसुलीत वाढ होणे तसेच मनपा उत्पन्न वाढीचे दृष्टीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 140अ मधील तरतुदीनुसार आगाऊ मालमत्ता कर भरणा-या मालमत्ताधारकांकरिता आर्थिक वर्षाचे दोन्ही सहामाहीचे संपूर्ण बिलांची रक्कम आगाऊ भरणा केल्यास खालीलप्रमाणे चालू आर्थिक वर्षाचे मागणीतील सामान्य करात सवलत लागू आहे.

| आगाऊ मालमत्ता कर भरणारे मालमत्ताधारक | 30 जून पूर्वी मालमत्ता कराचा एक रकमी भरणा करणारे मालमत्ताधारक | नवीन ज्या मालमत्तांवर प्रथम आकारणी कार्यवाही होऊन अशा मालमत्तांना प्रथम बिलाचा भरणा 03 महिन्यात करणारे मालमत्ताधारक |
|---|---|---|
| स्वतंत्र नोंद असलेल्या निवासी वापराच्या मालमत्तेस | 5% | 5% |
| बिगरनिवासी / मिश्र/ औद्योगिक / मोकळया जमिनी इत्यादी मालमत्तेस | 5% | 5% |

तथापि सध्या सुरु असलेल्या मालमत्ता सर्वेक्षणात सुमारे 2 लाख आकारणी न झालेल्या नवीन मालमत्ता आढळणार आहेत. या मालमत्ता प्रत्यक्षात 03 ते 06 वर्षापूर्वीच अस्तित्वात असल्याचे सर्वेक्षणात निदर्शनात आले आहे. संबंधित मालमत्ताधारकांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण 8 मधील नियम 05 मधील तरतूदीनुसार मालमत्ता कराची आकारणी करणेकामी नोटीस देऊन कर आकारणी करुन घेणे आवश्यक होते. त्यामुळे सध्या अस्तित्वातील मालमत्ता किंवा त्याच वर्षात निर्माण होणा-या नवीन मालमत्ता यावर आगाऊ कराचे सवलतीची 03 महिन्याची मुदत यांना जशीच्या तशी लागू करणे न्यायोचित ठरणार नाही. त्यामुळे सदर मालमत्ताधारकांना दिनांक:20/10/2022 रोजीचे परिपत्रकानुसार नवीन मालमत्तांना देणेत येणा-या 03 महिने सवलतीच्या कालावधी ऐवजी फक्त 01 महिन्याचा कालावधी सवलत योजनेचा लाभ घेणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४६** **विषय क्रमांक- ५४६**
**दिनांक – १३/२/२०२४** **खाते-मा.आयुक्त**

<table>
<tr><td>विषय क्र. ५४६<br>दिनांक -<br>१३/२/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. माध्य/शि/०५/कावि/५२/२०२४ दि.६/२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सरु असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना शासन मान्यतेबाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ५४६<br>दिनांक -<br>१३/२/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. माध्य/शि/०५/कावि/५२/२०२४ दि.६/२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, शिक्षण मंडळ व सेवाभावी संस्था आकांक्षा फांउडेशन यांच्या मदतीने व संयुक्त विदयमाने पूर्व प्राथमिक वर्गापासुन पाच इंग्रजी शांळा सुरु केलेल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतुन इयता ८ वी उतीर्ण झालेल्या विदयार्थ्यांसाठी माध्यमिक शिक्षण उपलब्ध करुन देण्याकरीता याच शाळांमध्ये स्व:उत्पन्नातुन ( सेवाभावी संस्था आकांक्षा फांऊडेशन यांच्या मदतीने ) इंग्रजी माध्यमाच्या खाली नमुद दोन शाळांना जोडून शैक्षणिक वर्ष २०२३- २०२४ पासुन माध्यमिकचे इंग्रजी माध्यमाचे इयत्ता ९ वी चे वर्ग सुरु केले असुन, नैसर्गिक वाढीने सन २०२४-२०२५ मध्ये इयत्ता १० वी चे वर्ग सुरु करणार आहे.<br><br>शैक्षणिक वर्ष २०२३ – २०२४ पासुन सुरु केलेल्या शाळांची माहिती.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शाळेचे नाव</th><th>वर्ग</th><th>माध्यम</th></tr>
<tr><td>१</td><td>श्रीम. अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्रजी माध्यम शाळा पिंपरी</td><td>९ वी ते १० वी</td><td>इंग्रजी</td></tr>
<tr><td>२</td><td>छत्रपती शाहूजी महाराज इंग्रजी माध्यम शाळा कासारवाडी</td><td>९ वी ते १० वी</td><td>इंग्रजी</td></tr>
</table>
<br>महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन क्र. नमाशा २००९ ( ४९७/०९) माशि – १ मंत्रालय विस्तार भवन मुंबई, ४०००३२ दि. ११ जुन २००९ शासन निर्णयानुसार स्वयंअर्थसाहय्यित योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्तरावर उपरोक्त नमुद ०२ शाळा इयता ९ वी वर्गापासुन सुरु करण्यात आलेल्या असुन या शाळांना राज्यशासनावर कोणताही आर्थिक बोजा / भार येणार नाही, या अटिच्या अधिन राहून स्व:उत्पन्नातुन सुरु असलेल्या माध्यमिक शाळांना परवानगी देण्याचे तत्व आवलंबिले आहे.<br><br>त्या नुसार शासन निर्णय क्रमांक नमाशा १४१५ / प्र.क्र. ३०/एसएम-२ दि. २२ एप्रिल २०१६ नुसार पुणे महानगरपालिकेच्या ०४ इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यात आलेली आहे .शासन निर्णय कमांक एसएफएस-१०१७ /प्र.क्र.६८५/एसएम-२ दि. ०२ नोव्हेंबर २०१७ नुसार पुणे महानगरपालिकेच्या १२ इंग्रजी माध्यमाच्या शांळाना मान्यता दिलेली आहे. त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्राथमिक / माध्यमिक विभाग व आकांक्षा फाऊंडेशन यांच्या झालेले सामजंस्य करारानुसार सन २०२३ – २०२४ पासुन इयत्ता ९ वी चे वर्ग सुरु केलेल्या श्रीम. अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्रजी माध्यम शाळा पिंपरी व छत्रपती शाहूजी महाराज इंग्रजी माध्यमिक शाळा कासारवाडी या दोन शाळांना इयता ९ वी ची व नैसर्गिक वाढीने सन २०२४-२०२५ पासुन इयता १० वी</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | ची इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांना शासनाची मान्यता मिळणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५४७**
**दिनांक – १३/२/२०२४**

**विषय क्रमांक- ५४७**
**खाते-मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५४७ दिनांक - १३/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१५४/२०२४ दि.१३/२/२०२४ अन्वये, सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकातील अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये वाढ करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५४७ दिनांक - १३/२/२०२४** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/१५४/२०२४ दि.१३/२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहराचा विकास झपाट्याने वाढ होत आहे. त्यास अनुसरुन स्थापत्य प्रकल्प विभागामार्फत विविध रस्ते, फुटपाथ, सायकल ट्रॅक विकसित करणेत आले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील विविध हिरव्या जागा (Green Spaces/Gardens) व बागा सलगपणे फुटपाथ व समर्पित सायकल ट्रॅक द्वारे जोडणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरव्यापी मास्टर प्लॅन तयार करण्याचे आणि हरित सेतु प्रकल्प राबविणेचे नियोजन आहे. पिंपरी चिंचवड शहर ही संकल्पना राबविणारे देशातील पहिले शहर असेल. शहरात सुरक्षित, सलंग्न आणि शाश्वत सायकलिंगकरीता पायाभूत सुविधा निर्माण करण्यास मदत होणार आहे.<br>पिंपरी चिंचवड शहराला भविष्यात Livable City करण्यासाठी हरित सेतु प्रकल्प महत्वाचा असुन त्याची अंमलबजावणी करणेसाठी Pilot व Master Plan तयार करुन पुढील दशकांमध्ये टप्प्या-टप्प्याने शहराचे संपुर्णपणे पर्यावरण पुरक परिवर्तन करण्याचा संकल्प आहे. पिंपरी चिंचवड शहराला पुढील १०-१५ वर्षामध्ये पर्यावरणपुरक व शाश्वत विकास साधणेसाठी शहरातील नागरिकांना सक्षम सार्वजनिक वाहतुक, प्रशस्त व सावलीयुक्त सायकल ट्रॅक व पादचारी मार्ग या बाबींची एकमेकांशी पुरक असे नियोजन करुन त्याची यशस्वी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. मनपाने हाती घेतलेला हरित सेतु प्रकल्प हा त्याच धर्तीवरप्रथम प्रायोगिक (Pilot) तत्वावर प्राधिकरण से.क्र. २४ ते २८ या भागामध्ये राबवुन त्याचा टप्प्याटप्प्याने शहरभर विस्तार करणेचे नियोजन आहे. |

त्याकरीता सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात कामाचा समावेश करणेत आलेला आहे, परंतु सदर कामाकरीता सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये पुरेशी अंदाजपत्रकीय रक्कम नसल्याने सदर रक्कम सुधारीत करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखा शिर्ष | पा. क्र. | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२३-२४ ची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत हरीत सेतु विषयक कामे करणे. (222300865) | विशेष योजना | ६५ | १३६ | १५,००,००,००० | २००,००,००,००० | १,००० |
| **एकुण** | | | | | **१५,००,००,०००** | **२००,००,००,०००** | **१,०००** |

वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये वाढ करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:** **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**